# जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती

क्रमांक:कक्ष-२०/नि.नि /अका/कावि ८२५ /१७

दिनांक:- १५/७/२०१७

## सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरीता प्रसिध्दीपत्रक

अमरावती जिल्हयातील सन २०१७ मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणूकीकरीता नगरपरिषद चिखलदरा क्षेत्रातील नागरीकांना या सुचनेव्दारे सूचित करण्यांत येते की, राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १३/६/२०१७ चे आदेशानुसार चिखलदरा नगर परीषदेच्या पुढे होवू घातलेल्या निवडणूकी करीता सदस्य पदाचे महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ मधिल तरतुदी नुसार मा. प्रादेशीक संचालक नगर परिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी त्यांचे दिनांक १६/६/२०१७ आदेश क्रमांक प्रासनप्र अका/कावि २०९/२०१७ दिनंक १६/६/२०१७ नुसार नगर परिषदांची सदस्य संख्या व राखुन ठेवावयाच्या सदस्य संख्या निश्चित केलेली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक अ दिनांक १६ जुन २०१७ नुसार अमरावती जिल्हयातील चिखलदरा नगर परिषदेच्या सन २०१७ मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणूकी करीता सदस्यांचे जागांचे आरक्षणाची सोडत काढणे, याकरीता सोडतीचा कार्यक्रम दिनांक २०/७/२०१७ रोजी ( गुरुवार) दुपारी १२.०० वाजता नगर परिषद कार्यालय चिखलदरा या ठिकाणी ठेवण्यात आले आहे.

सोडतीकरीता संबंधित चिखलदरा नगर परिषदेच्या क्षेत्रातील नागरीकांना सोडतीकरीता हजर राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी अमरावती